महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

जा.क्र. :औसंवि/ब/क्रीडा/ २६४३८ दिनांक : २९/०९/२०१३

# परिपत्रक

विषय : सर्वसाधारण ओदश क्र. १३२, दि. २४/११/१९९३ मधील तरतूदीनुसार 'विशेष नैमत्तिक रजा' मंजूरीबाबत.

***********

सर्वसाधारण ओदश क्र. १३२,दि. २४/११/१९९३ अन्वये खेळाडू कर्मचाऱ्यास विविध स्तरावरील क्रीडास्पर्धेत सहभागी होण्यासाठी राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेशी संबंधीत प्रशिक्षण शिबीरात (Coaching Programme) सहभागी होण्यासाठी, तसेच मान्यता प्राप्त संस्थेद्वारा आयोजित गिर्यारोहण स्पर्धेत सहभागी होण्यासाठी निवड झाल्यास एका कॅलेंडर वर्षात ३० दिवस 'विशेष नैमित्तिक रजा '(Special Casual Leave) मंजूरीबाबत तरतुद करण्यात आलेली असून, सदर आदेशातील C(I) नुसार स्पर्धेच्या काळातील कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती नियमित करण्याबाबतचे अधिकार संबंधीत विभाग प्रमुख यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने कार्यकारी संचालक (मासं) यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

१) **या कार्यालयाचे पत्र क्र. ७९८३ दि. ११/०३/२०११ मधील सुचना रद्दबाबद्दल ठरविण्यात येत आहेत. यापुढे खेळाडू कर्मचाऱ्यांस विशेष नैमित्तीक रजा मंजुर करण्याचे अधिकार सर्वसाधारण आदेश क्र. १३२ दि. २४/११/१९९३ मध्ये नमुद केल्यानुसार संबंधीत विभाग प्रमुख यांना प्रदान केलेले असल्याने परिमंडलांतर्गत खेळाडू कर्मचाऱ्यांची 'विशेष नैमत्तिक रजा' मंजूरीबाबतची प्रकरणे परिमंडल स्तरावर निर्णयांकीत करावी तसेच सांघिक कार्यालयातील विशेष नैमित्तीक रजेची प्रकरणे संबंधीत विभागा कडून निकाली काढण्यात यावीत.**

२) **खेळाडू कर्मचाऱ्याने स्पर्धेत सहभाग घेण्यापूर्वीच 'विशेष नैमत्तिक रजा' मंजूर करुन घ्यावी. कर्मचारी 'विशेष नैमत्तिक रजा' मंजूर झाल्याशिवाय स्पर्धेमध्ये सहभागी झाल्यास त्या काळातील त्याची अनुपस्थिती ही कुठल्याही कारणास्तव 'विशेष नैमत्तिक रजा' म्हणून मंजूर करण्यात येवू नये.**

सर्वसाधारण आदेश क्र. १३२, दि. २४/११/१९९३ मधील अनु. क्र. १,२ व ३ तसेच, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये पंच (Umpire) म्हणून निवड झालेल्या कर्मचाऱ्यास आणि तत्कालीन म.रा.वि.मंडळाचे प्रशासकीय परिपत्रक क्र. ९३ दि, १३/०५/१९८१ मध्ये नमूद केलेल्या **स्पर्धा व्यतिरिक्त उर्वरीत स्पर्धांमध्ये खेळाडू कर्मचारी स्वतःहून पुरस्कृत होऊन (कंपनीचे प्रतिनिधीत्व न करता) वैयक्तिकपणे सहभागी होत असल्याने, सदर स्पर्धे दरम्यान अथवा सरावा दरम्यान कर्मचाऱ्यास दुखापत झाल्यास, अशा कर्मचाऱ्यांना सामान्य आदेश क्र. १३२, दि. २४/११/१९९३ मधील अ.क्र. ४,५,६ च्या अनुषंगाने, सक्षम अधिकारी यांनी 'विशेष नैमत्तिक रजा' मंजूर केली असली तरीही, त्यांना कामावर असताना अपघात झाला असे समजण्यात येणार नसल्याने वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देखील मिळणार नाही.**

तरी, विशेष नैमित्तीक रजेचे कार्यालयीन आदेश निर्गमित करताना सदर कार्यालयीन आदेशामध्ये वरील बाबीचा ठळकपणे उल्लेख करण्यात यावा. सदर परिपत्रक ईमेलद्वारे पाठविण्यात येत असून परिपत्रकाची छापील प्रत पाठविण्यात येणार नाही.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या Intranet वरील Reports या शिर्षकाखालील LIR Section येथे प्रसिध्द करण्यात आले आहे.

किशोर पवार
(किशोर पवार)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत सविनय सादर :
सर्व विभाग प्रमुख, महावितरण
प्रत :
१) उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., संवसु परिमंडल भांडूप / जळगांव / नाशिक / अमरावती / रत्नागिरी / बारामती / पुणे / कल्याण / नागपूर शहर / नागपूर ग्रामीण / औरंगाबाद / लातूर / नांदेड / कोल्हापूर.
२) उप कामगार अधिकारी (क्रीडा), म.रा.वि.वि.कं.मर्या., संवसु परिमंडल, नागपूर / औरंगाबाद.
- आपणास आदेशीत करण्यात येते की, सदर परिपत्रकास कक्ष पातळीपर्यंत प्रसिध्दी घ्यावी.